# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ना.प्र.वि. पहिली खबर क्र. FIR No. 19 वर्ष Year 2025 दिनांक Date 20/5/25

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधि. १९८८ कलमे Sections ०७.
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ........ तारीख पासून Date from 24/4/25 वेळ Time ........ तारीख पर्यंत Date to 20/5/25 वेळ Time ........

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 24/4/2025 वेळ Time 17.30

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 02/25 तारीख Date 20/5/2025 वेळ Time 8:25 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information ........ लेखी / तोंडी Written / Oral लेखी.

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O. P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणचे नाव Address of Occurrence Name म्हाडा कार्या. ठिकाणाचे नंबर No. if any ओट. 03 गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road ........

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place बांद्रा गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka मुंबई जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name मेहबुब आझमी. (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name सत्तार.

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 48 वर्ष (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय. फोन नं. Phone No. ९९२०६९००२

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........

(g) धर्म Religion मुस्लीम. जात Caste ........ जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address ........ गल्ली/सर्व्हे नं. Ward ........ घर/नाव नं. House Name No. ........ फोन/मो. नं. Phone No. ........ पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road पटेल स्टेट. जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village जोगेश्वरी. पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka मुंबई जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address लोढा युनिक. फर. हो. सो.

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

(1) विकास रामचंद्र कोरडे. वय- ४२ वर्षे रा.वि. निर्मला सोसा. सेक्टर-3६ प्लॉट. 3२ रुम. 3०3, कामोठे, नवी मुंबई.



Scanned with OKEN Scanner

फिर्यादी श्री. मेहबुब. अन्वर कान्हाईर, वय. ४८ वर्षे यांची. स्वतंत्र पानावर फिर्याद. टंकलिखीत. केलेली. वाचुन. तीलाच. गुन्ह्याची. "प्रथम खबर". म्हणुन. संबोधण्यात. यावी.

समक्ष.

(हेमंत नागरे.)
पोलीस निरीक्षक.
ला.प्र.वि, मुंबई.

फिर्यादी यांची सही.
20/05/2

फिर्याद                                    दिनांक १९/०५/२०२५.

श्री. मेहबूब अन्वर आझमी, वय ४७ वर्षे, व्यवसाय–नोकरी, पाओनियोर प्रॉपर्टी झोन सर्विसेस प्रा. लि. (फायनान्स अकाऊंटन्ट), रा.ठि. जी ६०८, लोधा युनिका को.ऑप.हौ.सोसा., पटेल स्टेट रोड, जोगेश्वरी (पश्चिम) मुंबई –४००१०२. मो.नं.९९२०६९६९२६. आधार कार्ड:– ६१६३ ०१०३९ १५८६.

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमूद पत्त्यावर एप्रिल २०२४ पासुन माझे परिवारासह राहण्यास आहे. मी पाओनियोर प्रॉपर्टी झोन सर्विसेस प्रा.लि. पत्ता – ४०१, बिझनेस स्क्वेअर, सॉलिटेड कॉरपोरेट पार्क, चकाला, अंधेरी (पुर्व) मुंबई –४०००९३ या ठिकाणी फायनान्स अकाऊंटन्ट म्हणून काम करतो. सदर कामातून मिळणाऱ्या उत्पनातून मी माझा व माझ्या परिवाराचा उदरनिर्वाह करतो.

मी राहत असलेली लोधा युनिका को.ऑप.हौ.सोसा ही लोधा बिल्डर्स यांनी ऑगस्ट २०२४ मध्ये आमच्या सोसायटीच्या ताब्यात दिली आहे. आमच्या सोसायटीमध्ये दिनांक ०३/०८/२०२४ मध्ये झालेल्या पहिल्या मिटींगमध्ये सोसायटीचे अध्यक्ष म्हणुन नावेद आदम बाशा शेख यांना, मला सदर सोसायटीचा खजिनदार व मोबिन सय्यद यांना सचिव व इतर सदस्य सदर सोसायटीच्या कामकाजाकरीता नेमण्यात आले होते. परंतु सोसायटीचे सचिव असलेले मोबिन सय्यद यांनी बेकायदेशीरपणे सोसायटीच्या फलॅट नं. ९०४, १००५ व इतर फलॅटच्या खरेदी व विक्रिच्या एन.ओ.सी. देण्याकरीता सोसायटीच्या पंजाब नॅशनल बॅक बचत खात्यामध्ये पैसे न घेता रोख स्वरूपात पैसे घेतले होते. सदरबाबत सोसायटीच्या जमा–खर्चाबाबत कोणतीही नोंद घेतली नाही. सदरबाबत मी सचिव मोबिन सय्यद यांना सदर बेकायदेशीर कामाबाबत जाब विचारला असता, त्यांनी आमच्या अपरोक्ष मिटिंग घेवुन माझ्यासह ०६ सदस्यांना सदर कमिटीवरून काढुन टाकले व त्यांच्या जवळच्या ०६ सदस्यांची आमच्या सोसासटीच्या कमिटीवर नेमणुक केली.

दिनांक १०/१२/२०२४, दिनांक ०७/०१/२०२५ व वेळोवेळी मी उपनिबंधक सहकारी संस्था, के. पश्चिम विभाग, बांद्रा (पुर्व) मुंबई यांच्या कार्यालयात जावुन मला व इतर सदस्यांना सचिव मोबिन सय्यद यांनी बेकायदेशीरित्या काढुन टाकले, म्हणुन तक्रारअर्ज केले होते. दिनांक ३१/०१/२०२५ रोजी सदर कार्यालयाने आम्हांस पुन्हा कमिटीवर घेण्याबाबत आदेश पारित केले होते. परंतु सचिव मोबिन सय्यद यांनी सदर कार्यालयाच्या आदेशाप्रमाणे मला व माझ्या बरोबर असणारे इतर सदस्य यांना सदर कमिटीवर न घेता आम्हास सचिव मोबीन सय्यद व त्याचे सहकारी यांनी शिवीगाळ करून मारहाण करण्याची धमकी दिली.

दिनांक ०७/०२/२०२५ रोजी मी व माझ्या सहकारी यांनी उपनिबंधक सहकारी संस्था, के. पश्चिम विभाग, बांद्रा (पुर्व) मुंबई या कार्यालयात आमची सोसायटी कमिटी हि बेकायदेशीर कामें करीत असून सोसायटी कायदयाप्रमाणे काम करीत नसल्याने सदरची सोसायटी कमिटी रद्द करण्याबाबत तक्रार अर्ज केला होता. या प्रमाणेच तक्रारअर्ज मी विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई येथे व इतर कार्यालयांत दिनांक १३/०२/२०२५ रोजी केला होता.

त्यानंतर आम्ही पुन्हा दिनांक १७/०२/२०२५ रोजी उपनिबंधक सहकारी संस्था, के. पश्चिम विभाग, बांद्रा (पुर्व) मुंबई यांना आमच्या सोसायटीची कमिटी हि कायदयाप्रमाणे काम करीत नसल्याने रद्द करण्याबाबत तसेच शासकिय प्रशासक नेमणूक करण्याबाबत तक्रार अर्ज केला, परंतु उपनिबंधक सहकारी संस्था, के. पश्चिम विभाग, बांद्रा (पुर्व) मुंबई यांनी सचिव मोबीन सय्यद यांच्या जवळचे असणारे मोहम्मद युसुफ अन्सारी, विकास माणे व कुमारी फिरजाह खान यांची प्रशासक म्हणून नेमणुक केली.

दिनांक १६/०४/२०२५ रोजी मी व जावेद शेख उपनिबंधक सहकारी संस्था, के. पश्चिम विभाग, बांद्रा (पुर्व) मुंबई यांच्या कार्यालयात जावुन सचिव मोबीन सय्यद व त्यांचे सहकारी यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही, अशी विचारणा करण्याकरीता गेलो असता सदर कार्यालयातील उपनिबंधक डॉ. श्री. सुनिल कोठावळे व त्यांचे सहकारी सहकार अधिकारी श्री. विकास कोरडे यांनी आमच्याकडे आम्ही दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे कारवाई करण्याकरीता ०४ लाख रूपयाची मागणी केली. सहकार अधिकारी विकास कोरडे हे लाचेची मागणी ०४ पेज म्हणजे ०४ लाख रूपये अशी सांकेतिक भाषेत करीत होते. त्यांना मी

Scanned with OKEN Scanner

०१ पेज म्हणजे किती अशी विचारणा केली असता सहकार अधिकारी कोरडे यांनी मला ०१ पेज म्हणजे ०१ लाख रूपये असे सांगुन ०४ पेज म्हणजे ०४ लाख रूपयाची मागणी केली.

उपनिबंधक सहकारी संस्था, के. पश्चिम विभाग, बांद्रा (पुर्व) मुंबईचे उपनिबंधक सुनिल कोठावळे व त्यांचे सहकारी सहकार अधिकारी श्री. विकास कोरडे यांनी मागणी केलेली रक्कम हि कोणतीही शासकीय शुल्क नसल्याने मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी त्यांच्याविरूध्द तक्रार देणेकरीता दि. २४/०४/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे आलो व लेखी तक्रार अर्ज दिला.

माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याकरीता लाप्रवि, मुंबई विभागाचे पोलीस निरीक्षक श्री. हेमंत खंडु नागरे यांची नेमणुक करण्यात आली. त्यानंतर पो.नि. नागरे यांनी मला माझे तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यावेळी लाप्रवि मुंबई येथे गोपनिय कारवाईकरीता हजर असलेले शासकिय पंच क्रमांक ०१ प्रित रामचंद्र जुनघरे व पंच क्रमांक ०२ आबासाहेब बाबासाहेब मातकर यांची मला ओळख करून दिली.

दिनांक २८/०४/२०२५ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान पोनि नागरे यांनी दोन शासकिय पंचासमक्ष माझ्या शर्टच्या आतील बनियनला व्हाईस रेकॉर्डर चालु करून लावला. त्यांच्या सुचनेप्रमाणे मी लोकसेवक श्री कोरडे यांना प्रत्यक्ष भेटण्याकरीता त्यांच्या कार्यालयात गेलो. सदरवेळी त्यांची व माझी प्रत्यक्ष भेट झाली. त्यांनी मला सांगितले की, यापुर्वी ठरल्याप्रमाणे सांकेतिक भाषेमध्ये ''पाच का बात हुआ ना... क्या दो चार का हुआ...'' असे बोलून पुढे त्यांनी मला ''तो आये क्या दो लेके आये... '' असे बोलले त्यावेळी शोकॉज नोटीस काढल्यानंतर देण्याचे ठरले असल्याचे मी त्यांना सांगितले. तेव्हा त्यांनी मला ''नोटीस के टाईम पे दो बोला था ना मै... कर लिया है क्या...'' असे बोलून पुढे ''शो कॉज पे जो डन हुआ है वो वो होगा ना उसका आधा परसेंट देना पडेगा...फिफ्टी परसेंट...'' असे बोलून शोकॉज नोटीस काढल्यानंतर चार लाख लाच रक्कमेपैकी पहिला हफ्ता म्हणून रूपये २,००,०००/– एवढी रक्कमेची मागणी करून रक्कम घेवून येण्याबाबत सांगितले. यावरून लोकसेवक कोरडे यांनी माझ्याकडे एकूण ४,००,०००/– लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर मी लोकसेवक विकास कोरडे यांना अंतिम शोकॉज नोटीस व ऑर्डर करणारे लोकसेवक, उप निबंधक श्री सुनिल कोठावळे यांना भेटण्याची विनंती केली असता, त्यांनी साहेब मंत्रालय येथे गेले असून तीन वाजता येतील, असे सांगून बाहेर थांबण्यास सांगितले. त्यावर मी त्यांचे कक्षाच्या बाहेर येवून थांबून राहीलो. त्यानंतर मी पुन्हा लोकसेवक श्री विकास कोरडे यांना भेटलो असता, लोकसेवक श्री विकास कोरडे यांनी मला ''रूको ना... शो कॉज नोटीस तयार करता है... तयारी मे रहो ना... असे बोलून पुढे ''चार पेपर वर्क... दो पेपर लेके आव कल... दो पेपर का तयारी करो...'' असे बोलून माझेकडे सांकेतिक भाषेमध्ये रू. ४,००,०००/– लाचेच्या रक्कमेपैकी २,००,०००/– रूपये ची मागणी करून दिनांक २९/०४/२०२५ रोजी घेवून येण्यास सांगितले. पडताळणी कारवाई दरम्यान माझे व लोकसेवक कोरडे यांच्यामध्ये झालेले संभाषण व्हाईस रेकॉर्डरव्दारे ध्वनीमुद्रीत करण्यात आले. त्याप्रमाणे पडताळणी पंचनामा तयार करण्यात आला आहे.

समक्ष

(हेमंत नागरे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

दिनांक २९/०४/२०२५ रोजी मी पुन्हा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक हेमंत नागरे यांचे समक्ष हजर झालो. त्यावेळी दोन शासकिय पंच हजर होते. पो.नि.नागरे यांनी माझ्या शर्टच्या आतील बनियनला व्हाईस रेकॉर्डर चालु करून लावला. पो.नि. नागरे यांच्या सांगण्यावरून मी लोकसेवक श्री. विकास कोरडे यांना त्यांचे कार्यालयात प्रत्यक्ष भेटण्याकरीता गेलो. सदर कार्यालयात माझी भेट लोकसेवक श्री. कोरडे यांचेसोबत झाली. त्यावेळी आमच्यामध्ये कामासंदर्भात चर्चा झाली परंतु शोकॉज नोटीस तयार झाली नसल्याचे मला त्यांनी सांगितले. तसेच उप निबंधक कोठावळे साहेब आज देखील आले नसल्याचे सांगितले व मला शोकॉज नोटीस तयार झाल्यावर कॉल करतो, असे सांगितले. म्हणून मी लोकसेवक कोरडे यांना लाचेची रक्कम न देता सदर कक्षामधून बाहेर आलो. पडताळणी कारवाई दरम्यान माझे व लोकसेवक कोरडे यांच्यामध्ये झालेले संभाषण व्हाईस रेकॉर्डरव्दारे ध्वनीमुद्रीत करण्यात आले. त्याप्रमाणे पडताळणी पंचनामा तयार करण्यात आला आहे.

दिनांक १५/०५/२०२५ रोजी मी पुन्हा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक हेमंत नागरे यांचे समक्ष हजर झालो. त्यावेळी मी पो.नि.नागरे यांना लोकसेवक कोरडे यांनी मला वॉट्सअप कॉलद्वारे संपर्क करून आज रोजी त्यांच्या कार्यालयात भेटण्यासाठी बोलावले आहे. असे सांगितले. त्यावेळी पो.नि.नागरे यांच्या सुचनेवरून मी माझ्या व्हॉट्सअप क्रमांक ९९२०६९६९२६ वरून लोकसेवक श्री. विकास कोरडे यांचे व्हॉट्सअप क्रमांक ९८८११७१८०७ वर संपर्क केला असता, माझ्यात व लोकसेवक श्री. कोरडे यांचेमध्ये कामासंदर्भात चर्चा झाली. चर्चेदरम्यान मी लोकसेवक कोरडे यांना "अरे वो शोकॉज नोटीस का क्या हुआ विकास..." असे विचारले असता, लोकसेवक श्री. विकास कोरडे यांनी "नही वो तो साहब नही बोल रहे है... और वो चेतन भी नही है... छुट्टी पे गया है... मंडे आनेवाला है..." असे सांगून मला सोमवारी दिनांक १९/०५/२०२५ भेटण्याकरीता त्यांचे कार्यालयात बोलावून लोकसेवक कोरडे यांनी कॉल कट केला. सदरचे मोबाईल व्हॉटसअपवरील संभाषण पोनि नागरे यांनी दोन पंचासमक्ष डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत केलेले आहे. संभाषणामध्ये लोकसेवक श्री विकास कोरडे यांनी मला शो कॉज नोटीस तयार झाली नसून सोमवार दिनांक १९/०५/२०२५ रोजी भेटण्याकरीता लोकसेवकाच्या कार्यालयात बोलाविले असल्याने त्या दिवशीची कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. असे पो. नि.नागरे यांनी मला सांगून दिनांक १९/०५/२०२५ रोजी लाप्रवि कार्यालयात हजर होण्यास सांगितले.

दिनांक १५/०५/२०२५ रोजी पो.नि.नागरे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी आज दिनांक १९/०५/२०२५ रोजी लाप्रवि कार्यालयात त्यांच्या समक्ष हजर झालो. त्यानंतर मी, पंच, सपोआ उबाळे, पोनि नागरे असे लाप्रवि कार्यालयातील गोपनिय कक्षात गेलो. तेथे पोलीस हवालदार सुनिल रावराणे उपस्थित होते. तेथे प्रथम पोनि/नागरे, मी व पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले गेले. वक्तव्य ध्वनीमुद्रीत केल्यानंतर पंच, पोनि नागरे व मी व सपोआ उबाळे असे कक्षामध्ये हजर असताना १६.१७ वाजेच्या सुमारास लोकसेवक कोरडे यांचा मोबाईल क्रमांक ९८८११७१८०७ वरून माझा मोबाईल क्रमांक ९९२०६९६९२६ वर वाट्सअप कॉल आला. सदरवेळी लोकसेवक कोरडे यांनी मला किती वेळात येणार

समक्ष

(हेमंत नागरे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

आहे? अशी विचारणा केली. त्यावेळी लोकसेवक कोरडे यांना मी १० ते १५ मिनीटांत निघणार येणार असल्याबाबत सांगितले. तसेच लोकसेवक यांनी ऑफिसच्या बाहेर आल्यावर त्यांना कॉल करा, असे सांगितले. माझे व लोकसेवक कोरडे यांच्यामध्ये झालेले वॉट्स संभाषण व्हाईस रेकॉर्डरव्दारे पो.नि. नागरे यांनी दोन पंचासमक्ष ध्वनीमुद्रीत केले.

त्यानंतर पोनि नागरे यांनी सापळा पथकास बोलावून घेतले. पो.नि. नागरे यांनी पंचाना सापळा पथकातील अधिकारी/अंमलदार व पोलीस वाहने/वाहन चालक यांची सापळापुर्व/सापळा पथकात नेमणुक करण्यात आली असल्याचे सांगून, त्यांची पंचांना ओळख करुन दिली.

त्यानंतर सपोआ उबाळे यांनी मला, पंचाना व सापळा कारवाई पथकातील पोलीस अमंलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. मी पंचासमक्ष पोनि नागरे यांच्याकडे लोकसेवक श्री. विकास कोरडे यांना २,००,०००/– (अक्षरी दोन लाख रूपये फक्त) लाच म्हणून दयावयाची होती. परंतु माझेकडे ५०० रूपये दराच्या १०० भारतीय चलनी नोटा असे एकूण ५०,०००/– रूपये असल्याने मी पोनि नागरे यांचेकडे हजर केले. सदर नोटांचे पो.शि. परब यांनी लाप्रवि कार्यालयातील झेरॉक्स मशिनवर झेरॉक्स प्रति काढल्या. पो.नि. नागरे यांच्या सुचनेप्रमाणे नोटांच्या झेरॉक्स काढलेल्या प्रतिवर पंचानी स्वाक्षऱ्या केल्यानंतर पो.नि. नागरे यांनी समक्ष म्हणून स्वाक्षरी करुन सदरच्या प्रति ताब्यात घेतल्या. परंतु लोकसेवक यांना लाचेची रक्कम २,००,०००/– दयावयाचे असल्याने पो.नि.नागरे यांनी ५०० दराच्या ३०० खेळण्यातील नक्कली नोटा व मी हजर केलेल्या ५०० रू दराच्या १०० भारतीय चलनाच्या नोटा असे एकत्रित करून २,००,०००/– (अक्षरी दोन लाख रूपये फक्त) असे चार बंडल तयार केले.

त्यानंतर पो.नि. नागरे यांच्या सुचनेप्रमाणे पो.ह.कावले यांना बोलाविण्यात आले. त्यांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या बॅगेमधील डब्यातील अॅन्थ्रॉसीन पावडर दाखवुन त्याच्या गुणधर्मा संदर्भातील माहिती दिली. तसेच अॅन्थ्रासीन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती देवून प्रात्यक्षिक देखिल करून दाखविले. त्यानंतर पो.नि. नागरे यांनी लाचेची रक्कम रूपये २,००,०००/– (रूपये ५००/– दराच्या १०० भारतीय चलनी नोटा व ५०० दराच्या ३०० खेळण्यातील नक्कली नोटा ) रक्कमेस पो.ह. कावळे यांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता, त्यांनी सदरच्या सर्व नोटांच्या दोन्ही बाजूस कापसाच्या बोळयाने अॅन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर पो.नि. नागरे यांचे सुचनेवरून पो.ह. कावळे यांनी कार्यालयातील लाईट बंद करून काळया प्रकाशामध्ये सदर नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावलेबाबत पंचासमक्ष अल्ट्राव्हायलेट लाईटच्या प्रकाशात दाखवून हिरवी चकाकी असल्याची खात्री केली. त्यानंतर ते चारही लाचेच्या रक्कमेचे बंडल पो.ह. कावले यांनी निळया रंगाच्या कापडी पिशवीमध्ये ठेवली व सदरची पिवशी माझेकडे असलेल्या लॅपटॉप बॅगच्या चैनीच्या पहिल्या कप्प्यात ठेवली.

त्यानंतर पो.नि. नागरे यांच्या सुचनेप्रमाणे पथकातील अंमलदार पो.शि. परब यांनी सापळा कारवाईसाठी आवश्यक असलेली साधनसामुग्री घेवुन कार्यालयाच्या आवारात उभ्या असलेल्या एक टाटा सुमो व एक बोलेरो पोलीस वाहनांमध्ये ठेवून आम्ही सापळा कारवाई पथकातील अधिकारी व अंमलदार विभागून बसलो. सपोआ उबाळे व पो.नि. नागरे यांनी नमुद दोन्ही वाहन चालकांना वाहने एकत्रित एकामागोमाग एक याप्रमाणे बांद्रा कोर्टच्या दिशेने घेण्यास सांगितले. सदर ठिकाणी असलेल्या प्रकाशगड

समक्ष

(हेमंत नागरे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

कार्यालयाजवळ आल्यानंतर पो.नि. नागरे यांच्या सुचनेप्रमाणे पोलीस वाहने कोणासही संशय येणार नाही, अशा रितीने रस्त्याच्या बाजूला थांबविण्यात आले.

त्यानंतर सदर वाहनामध्ये सपोआ उबाळे व पो.नि. नागरे यांनी पंचाना व मला सापळा कारवाई दरम्यान आवश्यक असलेल्या सुचना पून्हा दिल्या. तसेच मला लाचेची रक्कम दिल्यावर माझ्या डोळयावरचा चष्मा काढून इशारा करावा, अशी माहिती दिली. दरम्यानच्या वेळेत लोकसेवक श्री. कोरडे यांनी त्यांच्या मोबाईलवरून मला पुन्हा वॉट्सअप कॉल केला. त्यावेळी १६.५४ वाजले होते. लोकसेवक यांनी मला सांगितले की, ''साहेब मंत्रालयात गेले असून तुम्हास कार्यालयात येण्यास किती वेळ लागेल अशी विचारणा केली'' त्यावेळी मी लोकसेवक कोरडे यांना ५ मिनिटात येतो, असे सांगून त्यांच्या सांगण्याप्रमाणे सोबत पैसे आणले आहे, असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक कोरडे यांनी मला कार्यालयाच्या गेटवर आल्यानंतर फोन करण्यास सांगितले. माझे व लोकसेवक कोरडे यांच्यामध्ये झालेले मोबाईल वॉट्सअप संभाषण व्हाईस रेकॉर्डरव्दारे पो.नि.नागरे यांनी दोन पंचासमक्ष ध्वनीमुद्रीत करण्यात आले.

त्यानंतर मी भेटीकरीता जाण्यापुर्वी पो.नि. नागरे यांनी पंचासमक्ष त्यांच्याकडील डिजिटल व्हाईस रेकॉर्डर काढून तो चालू करुन मी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बनियनला पो.नि नागरे यांनी लावला. त्यानंतर मी व माझे पुढे मागे सापळा पथक वेगवेगळे चालत चालत बाबा कोला दुकानाजवळ जावून थांबलो. त्यावेळी मी लोकसेवक यांना वॉट्सअप कॉल करून मी म्हाडा कार्यालय, गेट समोरील बाबा कोला दुकानाजवळ आलो असल्याबाबत सांगितले. थोडयाच वेळात लोकसेवक विकास कोरडे हे मी उभा असलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी आमच्यात माझ्या कामासंदर्भात चर्चा झाली. त्यादरम्यान लोकसेवक कोरडे यांनी माझ्याकडे लाचेच्या रकमेची मागणी केली. त्यानुसार मी त्यांना रू. २,००,०००/– (रूपये ५००/– दराच्या १०० भारतीय चलनी नोटा व ५०० दराच्या ३०० खेळण्यातील नक्कली नोटा ) रूपये ठेवलेली निळया रंगाची कापडी पिशवी माझ्या लॅपटॉपच्या बॅगेतून काढून लोकसेवक विकास कोरडे याच्याकडे दिली. सदरची रक्कम लोकसेवक विकास कोरडे यांनी उजव्या हाताने स्विकारून दोन्ही हाताने गुंडाळून स्वत:च्या ताब्यात घेतली. त्यावेळी सदरची रक्कम मी लोकसेवक यांना मोजून घेण्याबाबत सांगितले असता लोकसेवक कोरडे यांनी सदर पिशवी उघडून आतमध्ये असलेल्या नोटांचे बंडल यास हात लावुन पैशाची खात्री करून घेतली. त्यांनतर मी लाच रक्कम स्विकारल्याबाबत पुर्वनियोजित सापळा पथकास माझ्या डोळयावरचा चष्मा काढून इशारा केला असता, दबा धरून बसलेल्या पथकामधील अधिकारी व अंमलदारांनी लोकसेवक विकास कोरडे यांना रंगेहाथ १७:१० वा. सुमारास ताब्यात घेतले.

तरी दिनांक २४/०४/२०२५ ते १९/०५/२०२५ रोजी १७:१० वा.दरम्यान लोकसेवक विकास रामचंद्र कोरडे, वय–४७ वर्षे, (पद–सहकार अधिकारी, कार्यालयाचा पत्ता:– उपनिबंधक, सहकारी संस्था, के–पश्चिम विभाग, बांद्रा (पुर्व) मुंबई–४०००५१) यांनी मी व माझे इतर साथीदार यांनी वेळोवळी उपनिबंधक सहकारी संस्था, के. पश्चिम विभाग, बांद्रा (पुर्व) मुंबई येथे आमची लोधा युनिका को.ऑप.हौ. सोसायटीची कमिटी हि बेकायदेशीर कामे करीत असून सोसायटी कायदयाप्रमाणे काम करीत नसल्याबाबत

समक्ष

(हेमंत नागरे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,

Scanned with OKEN Scanner

केलेल्या तक्रार अर्जावर कारवाई करण्याकरीता माझेकडून रू. ४,००,०००/— मागणी करून, पहीला हफता म्हणुन रू. २,००,०००/— हे म्हाडा कार्यालय, गेट नंबर ०३, बाबा कोला दुकानासमोर या ठिकाणी स्विकारली असता, त्यास रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले, म्हणून माझी त्यांचे विरोधात कायदेशीर तक्रार आहे.

माझी फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केलेली असून ती मी मराठीत वाचून पाहीली असता ती बरोबर व खरी आहे.

समक्ष

(हेमंत नागरे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ सात्वरीत
Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ २००,०००/- रु.
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........
Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी रकाना क्र. ७ मधील आरोपीताने 'फि' यांचे जाबीदार सोबती वेळोवेळी इमारतीमध्ये, सहकारी 'डेरमा' के 'पाश्चिम विभाग, बृहन्मुंबई येथे 'फि' यांची मोठ्या को. हौ. सोसा. कमिटी ही बेकायदेशीर कामे करीत असून, सोसा. कायद्याप्रमाणे काम करीत नसल्याबाबत केलेल्या तक्रार अर्जावर कारवाई करण्याकरिता 'फि' यांच्याकडे चार लाखाची लाचेची मागणी केली व पहिला हप्ता दोन लाख स्विकारताना. त्यावेळी लोकसेवक यांना रंगेहाथ पकडले म्हणून गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या
तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ........ हेमंत नागरे - पोलीस निरीक्षक,

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

........ जिल्हा ........ राज्य ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 (Name of I.O) ........ Rank ........ No. ........

(1) Registered the case and took up the Investigation or Directed to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to ........
(3) Transferred to P. S. ........ on point of jurisdiction.
District ........

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ........ हेमंत नागरे
पदनाम Rank ........ पोलीस निरीक्षक
तपासिक अ. चा कोड क्र. ........ ला.प्र.वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........
1. Date and time of submitted to the Court.

| प्रत<br>Copy to | 2 फिर्यादी,<br>2. Complainant, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक),<br>3. Supdt. of Police (Computer), | 4. तपासिक अंमलदार,<br>4. Inv. Officer, | 5. स्थळ प्रत.<br>5. Office Copy. |
|---|---|---|---|---|

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner